MHRG190007452023

:: <u>भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.२६/२००६ मधील निशाणी क्र.६२ वरील आदेश</u> ::

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार/इंटरव्हेनर अब्दल्लाखान अहमदखान देशमुख तर्फे अखत्यारी फव्वाद अब्दल्लाखान देशमुख यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश १, नियम १० अन्वये त्यांना प्रस्तुत भुसंपादन निर्देशन अर्जामध्ये समाविष्ट करुन घेण्याबाबत विनंती केली आहे.

०२. अर्ज व अर्जाला मुळ अर्जदारने दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही पक्षाच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०३. अर्जदार/इंटरव्हेनरचे कथन की, मौजे बिजघर, ता.महाड, जि.रायगड येथील सर्वे नं.२१, हिस्सा नं.१० ही मिळकत मुळतः देशमुख कुटुंबियांची म्हणजेच या हरकतदाराचे पुर्वगामी आजोबा श्री.अहमदखान इस्माईलखान देशमुख व श्री.दाउदखान इस्माइलखान देशमुख यांनी विकत घेतली. त्यापैकी दाउद यांनी त्यांच्या हिश्याची मिळकत श्री.भागोजी अण्णाजी पवार यांना विक्री केली. श्री.अहमदखान इस्माईलखान देशमुख यांचे पश्चात सातबारा बजावणा–या अर्जदाराचे कुटुंबियांची वारसनोंद झालेली आहे व ती सर्व लोकदेखील आवश्यक पक्षकार आहेत. प्रस्तुत प्रकरणात अर्जदार श्री.भिक्या सोनू किजबिले मयत तर्फे वारस हे यांचा कूळहक्क १९५७ मध्ये त्यांच्या समक्ष रद्द झाला आहे व तशी हक्कनोंद क्र.९१९ प्रमाणे सदर मिळकतीतुन त्यांचे नावदेखील कमी झालेले आहे.

अशा परिस्थितीत प्रस्तुत प्रकरणी हे हरकत अर्जदार आवश्यक पक्षकार म्हणुन सामील होवू इच्छीत आहेत. सबब, हरकत अर्जदार यांना प्रतिवादीपणात सामील करुन घेणेबाबत आदेश होणेबाबत विनंती केली आहे.

०४. प्रस्तुत अर्जास मुळ अर्जदार यांनी विरोध केला आहे. त्यांचे असे कथन की, हरकत अर्जदार हे प्रस्तुत प्रकरणाशी संबंधित नाहीत तसेच त्यांचे नाव कागदोपत्री समाविष्ट नाही. हरकत अर्जदार यांनी दाखल केलेला सातबारा उतारा हा प्रस्तुत प्रकरणाशी संबंधित नाही. अर्जदारांनी त्यांचे हक्क सिध्द करण्यासाठी दिवाणी न्यायालयात जाऊन आपले हक्क सिध्द करावेत व त्यानंतर प्रस्तुतच्या भुसंपादन निर्देशन अर्जात पक्षकार म्हणुन समाविष्ट व्हावे. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०५. अर्ज उभयपक्षाच्या परस्पर विरोधी युक्तिवादाचे विवेचन करण्यात आले. याकामी दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुतचा मुळ अर्ज संपादित जमीनीच्या मागणीची वाढीव बाजारभावाची रक्कम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. मुळ अर्जदार यांनी सदर अर्जास आक्षेप नोंदविला आहे. सदर प्रकरणाची पडताळणी केली असता असे दिसुन येते की, प्रस्तावीत अर्जदार हे संपादन प्रक्रियेमध्ये समाविष्ठ नव्हते. प्रस्तावित अर्जदारांना सदर मिळकतीमध्ये हक्क आहे किंवा नाही ही बाब या प्रकरणामध्ये विचारात घेता येणार नाही. प्रस्तावित अर्जदारांनी सदर अनुतोष दिवाणी न्यायालयातुन मिळविणे आवश्यक आहे. एकुणच मुळ अर्जदार यांनी उपस्थित केलेली हरकत तथा आक्षेप लक्षात घेता प्रस्तुत अर्जातील हरकतदार अर्जदार यांचे कथन उचित व न्यायसंगत

नाही. याकामी मुळ अर्जदार यांच्या विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद ग्राहय धरण्यात येतो. सदर निष्कर्षास अनुसरुन खालील आदेश पारित.

**:: आदेश ::**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2026.01.29 16:21:23 +0530

महाड

दिनांक २९.०१.२०२६

**(श्रीमती एच.आर. जाधव)**
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड